# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** भंडारा **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0347 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/09/2020 19:13 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 14/08/2020
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/08/2020
   **Time From (वेळेपासून):** 11:06 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:01 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/09/2020 **Time (वेळ):** 17:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 039 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/09/2020 17:27 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सामाजिक न्याय भवन भंडारा,भंडारा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** प्रदिप सुरेश गेडाम

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

दिनांक:—०२/०९/२०२०

## फिर्याद

मी प्रदिप सुरेश गेडाम, वय ४९ वर्ष, धंदा— सचिव मागासवर्गीय समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह माटोरा ता.+जि. भंडारा रा. प्रशांत भालाधरे यंचे घरी किरायाणे, राजगोपाल वार्ड भंडारा ता.+जि. भंडारा.

मी दिनांक १२/०८/२०२० रोजी पोलीस निरीक्षक श्री. पुरूषोत्तम अहेरकर, ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने लेखी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली लेखी तक्रार खालील प्रमाणे आहे.

मी, समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील नमुद पत्यावर परीवारासह राहतो. मी आम्रपाली ज्ञानप्रकाश शिक्षण संस्था बेला, ता. जि. भंडारा या संस्थेचा सन २०१३ पासुन सचिव म्हणुन काम करीत आहे.

या संस्थे अंतर्गत सुरू असलेल्या प्रशांत विद्यालय माटोरा, ता. जि. भंडारा येथे सन १९९४ पासुन मी मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहे. तसेच याच संस्थे अतंर्गत असलेल्या मागासवर्गीय समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह माटोरा या वस्तीगृहाचा सन २०१३ पासुन मी सचिव म्हणुन काम पाहतो. मागासवर्गीय समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह माटोरा हे शासन मान्यता प्राप्त वस्तीगृह असुन समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा मार्फत वर्षाला मुलांच्या संख्येनुसार जुलै—ऑगस्ट महीण्यात ६० टक्के आणि मार्च—एप्रील महीण्यात ४० टक्के असे दोन टप्यात शासकिय अनुदान मिळते. वस्तीगृहाचे हे सर्व कामकाज सचिव या नात्याने मी करतो.

सन २०१९—२० चा दुसऱ्या टप्याचे ४० टक्के शासकिय अनुदान १,३२,४००/— रूपये करीता मी समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथे नियमा नुसार सर्व कागदपत्रांसह बिल सादर केले होते. समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथील राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, हे बिल चेक करून मंजुरीकरीता वरिष्ठांना सादर करण्याचे काम करतात.

वरील दुस—या टप्यातील १,३२,४००/— रूपये बिल जुलै/२०२० मध्ये मंजुर होउन आमचे वस्तीगृहाला मिळाले आहे. काल दि. ११/०८/२०२० ला राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण विभाग जि.प. भंडारा यांनी त्यांचे मो.न. ९९२३०६३६९२ वरून माझे वरील मोबाईल क्रमांकावर फोन करून मला म्हणाले की,'तुमचे वस्तीगृहाचे शासकिय अनुदान मंजुर करून दिले आहे. त्याचा मोबदला तुम्ही दिला नाही. श्रीमती कवाडे मॅडम प्रभारी समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग जि.प. भंडारा यांना सुध्दा बिल मंजुर करून दिल्याचा मोबदला मला दयावा लागतो असे म्हणाले. त्यावर मी त्यांना किती मोबदला दयावा लागेल असे म्हटले असता त्यांनी मला तुम्ही उदया प्रत्यक्ष ऑफीस मध्ये येवून मला भेटा फोनवर जास्त बोलता येत नाही. अशी बोलनी करून त्यांनी फोन बंद केला.

त्यामुळे मी आज दि. १२/०८/२०२० रोजी दुपारी ०२.०० वाजता चे दरम्यान समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथे जावून राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, यांना त्यांचे कार्यालयात जावून भेटलो तर त्यांनी मला वस्तीगृहाचे शासकिय अनुदानाचे दुस—या टप्यातील १,३२,४००/— रूपये बिल मी मंजुर करून दिले त्याचा मोबदला मला काही दिला नाही, मला श्रीमती कवाडे मॅडम प्रभारी समाज कल्याण अधिकारी, यांना सुध्दा बिल मंजुर केल्याचा मोबदला दयावा लागतो. तुम्ही २५,०००/— रूपये मला दया! असे म्हणाले त्यावर मी त्यांना ठिक आहे, मी उदया येवून भेटतो असे म्हणून तेथून निघून आलो.

मागासवर्गीय समाज कल्याण मुलांचे वस्तीगृह माटोरा ता.+जि. भंडारा या वस्तीगृहाचे दुस—या टप्यातील शासकिय अनुदान १,३२,४००/— रूपये मंजुर करवुन दिल्याचा मोबदला म्हणुन राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक यांनी श्रीमती कवाडे मॅडम प्रभारी समाज कल्याण अधिकारी, समाज

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्रशांत भालाधरे यांचे घरी ,राजगोपालचारी वार्ड भंडारा,भंडारा,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्रशांत भालाधरे यांचे घरी ,राजगोपालचारी वार्ड भंडारा,भंडारा,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9423672103

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश शंकरराव मुधोळकर | | | 1. शेषराव भोयर यांचे घरी ,राजगोपालचारी वार्ड, भंडारा, भंडारा,भंडारा,भंडारा, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेवुन स्वतः चे आर्थिक लाभा करीता यातील फिर्यादी यांना पडताळणी कार्यवाही वेळी फिर्यादीचे मागासवर्गीय समाज कल्याण मुलांचे माटोरा येथील वस्तीगृहाचे सन 2018-19 च्या दुस-या टप्याचे 40 टक्के शासकिय अनुदान एक लाख बत्तीस हजार चारशे रूपये मंजुर करून दिल्याचा मोबदला म्हणुन समाज कल्याण अधिकारी श्रीमती कवाडे मडम यांचे नाव सांगुन स्वतः करीता 25,000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 20,000/- रूपये लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केल्याने, आरोपीविरूध्द उपरोक्त कलमान्वये सदचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** bandopant dadaso bansode(I (Inspector)) / 1970 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

कल्याण विभाग जि.प. भंडारा यांचे नाव सांगुन मला २५,०००/— रूपये लाच मागत आहेत. माझी त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी त्याचे विरूध्द तक्रार देत आहे.

श्री. राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, यांच्याशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

वरील तक्रार दिल्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर, साहेब यांनी लाचेच्या सबंधाने पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. च्या कार्यालयामध्ये कार्यवाही कामी बोलावून घेतले. त्यांचे समक्ष मी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचाना वाचण्याकरीता दिली व पंचानी वाचुन, मला विचारपुस करून खात्री केली व तक्रारीवर मी, सापळा अधिकारी व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. सापळा अधिकारी यांनी मला व दोन्ही पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. दिनांक १२/०८/२०२० रोजीच्या मी दिलेल्या तक्रारीमध्ये गै.अ. यांना दि. १३/०८/२०२० रोजी भेटतो असे म्हणालो. तसेच आता त्यांचे कार्यालय बंद होण्याची वेळ झाल्याने गै.अ. श्री. राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण विभाग, जि.प. भंडारा यांचे विरूध्दची पडताळणी कार्यवाही दि. १३/०८/२०२० करण्याचे मी श्री. अहेरकर साहेब यांना विनंती केली. सर्वानुमते त्याप्रमाणे १३/०८/२० ला कार्यवाही करण्याचे ठरविले. त्याबाबत सविस्तर सुचना सापळा अधिकारी यांनी मला, दोन्ही पंच आणि पार्टीतील सर्व सदस्य यांना देण्यात आल्या. त्याबाबत सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचासमक्ष सविस्तर कार्यवाही केली.

दि. १३/०८/२०२० रोजी पडताळणी कार्यवाही सापळा अधिकारी यांनी मला व दोन्ही पंचानां पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना समजावुन सांगितल्या. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर सह मी, पंच क्र. १ श्री. पडोळे यांचे सोबत श्री. मुधोळकर, समाज कल्याण निरीक्षक यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात गेलो असता, त्यांचे कक्षात ईतर ३ ते ४ ईसम असल्यामुळे मुधोळकर हे मला नंतर या असे म्हणाले, त्यामुळे मी बाहेर येवून चाहापान टपरीच्या दुकानात थांबलो. अंदाजे दोन ते अडीच तासांनी पुन्हा श्री. मुधोलकर यांचे कक्षात गेलो तेव्हा ते अन्य ईसमा सोबत बाहेर जातांनी दिसुन आले तेव्हा त्यांनी मला ईशाऱ्याने त्यांचे कक्षात थांबण्यास सांगीतले. मी, पंच क्र. १ सोबत श्री. मुधोलकर यांची येण्याची वाट पाहत त्यांचे कक्षात थांबुन होतो. काही वेळाने श्री. मुधोलकर हे त्यांचे कक्षात आले आणि मला म्हणाले की, संध्याकाळी या! मॅडम नाही आहेत ऑफिसले, पाच साडे पाच वाजता पर्यंत असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मला फोन करून घ्याल असे म्हणुन पंचासोबत लाप्रवि कार्यालय भंडारा येथे परत आलो. श्री. मुधोलकर यांचे फोन येण्याची वाट पाहत ला.प्र.वि. भंडाराचे कार्यालयात थांबुन होतो. श्री. मुधोलकर यांचे मला १८.३० वा. पर्यत फोन न आल्याने तसेच कार्यालय बंद होउन गै.अ. हे घरी जावु शकतात. त्यामुळे मी सापळा अधिकारी श्री. अहेरकर सरांना दोन्ही पंचासमक्ष गै.अ. यांचे विरूध्दची पुढील पडताळणी कार्यवाही दि. १४/०८/२०२० रोजी करण्याची विनंती केली असता, मी केलेल्या विनंती वरून श्री. अहेरकर साहेब यांनी दोन्ही पंच तसेच पडताळणी व सापळा कार्यवाहीतील सदस्य आणि मला गोपनियता बाळगण्याच्या सुचना देवून दि. १४/०८/२०२० रोजीचे सकाळी १०.३० वा. कार्यालयात हजर राहण्याचे कळविले. याबाबत सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचासमक्ष सविस्तर कार्यवाही केली.

दि. १४/०८/२०२० रोजी दोन्ही पंच, मी लाप्रवि कार्यालयात हजर झाल्या नंतर सापळा अधिकारी श्री. अहेरकर सा. यांनी मला आणि पंच क्र. १ यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान पुन्हा सविस्तर सुचना समजावून सांगीतल्या. गै.अ. श्री. मुधोलकर यांचे विरूध्दची पुढील पडताळणी कार्यवाही करीता मी सुरू स्थितीत असलेल्या व्हाईस रेकार्डर सह पंच क्र. १ यांचेसोबत श्री. मुधोलकर यांचे कार्यालयात गेलो व गै.अ. यांना बाहेर येण्याचा ईशार केला असता गै.अ. हे बाहेर आले. त्यांचे सोबत बाहेर चहा टपरीवर जात असतांना मी गै.अ. यांना म्हणालो की, काही कमी करा‍ले लावा न तेव्हा गै.अ. यांनी मॅडम आता ते पन्नास म्हणत होती. पंचविस म्हणुन राहीली तर देवून टाका विषय संपला, असे म्हणुन गै.अ. श्री. मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण विभाग, जि.प. भंडारा यांनी मला **"माझे, मागास्वर्गीय समाज कल्याण मुलांचे माटोरा येंथील वस्तीगृहाचे सन २०१९—२० वर्षातील दुसऱ्या टप्याचे ४० टक्के शासकिय अनुदान एक लाख बत्तीस हजार चारशे रूपये मंजुर करुन दिल्याचा**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): bandopant dadaso bansode
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1970

Skhovkar
1076
ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन भंडा

**मोबदला म्हणुन प्रभारी समाज कल्याण अधिकारी श्रीमती कवाडे मॅडम यांचे नाव सांगुन स्वत: करीता २५,०००/— रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/— रूपये लाच रक्कम काही वेळाने त्यांचे कार्यालयातच स्विकारण्याची तयारी दर्शविली.** तेव्हा मी अर्ध्या तासांनी बॅकेमधून आणून देतो असे म्हणुन मी पंचासह लाप्रवि कार्यालय भंडारा येथे परत आल्यावर श्री. अहेरकर, साहेब यांनी मला व पंचास विचारून व व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.

मी आणि गै.अ. आमच्या मध्ये पडताळणी कार्यवाही दरम्यान झालेल्या संभाषणात, 'ते मॅडम पन्नास म्हणत होती असे गै.अ. यांनी मला म्हणल्याने' श्री. अहेरकर, साहेब यांनी श्रीमती कवाडे मॅडम प्रभारी समाज कल्याण अधिकारी जि.प. भंडारा मुळ पद समाज कल्याण आयुक्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन भंडारा यांची मला खरोखर लाचेची मागणी आहे किंवा कसे? हे पडताळणी करण्यासाठी पुन्हा मला व पंच क्र. १ सोबत सुरू स्थितीतील व्हाईस रेकार्डर सह श्रीमती कवाडे मडॅम यांचे कार्यालयात सामाजिक न्याय भवन भंडारा येथे पाठविण्यात आले असता, श्रीमती कवाडे मॅडम यांनी मला लाचेची मागणी न करता, उलट मुधोलकर हे कशासाठी पैसाची मागणी करीत आहेत. त्यास विचारते असे म्हणाल्या व मी मॅडमला मुधोळकरानी मागीतले होते पैसे देऊ का असे म्हटले असता त्यांनी ईशा—याने नाही म्हटले. त्यामुळे मी पंच क्र. १ यांचे सह लाप्रवि भंडारा येथे परत आलो. श्री. अहेरकर साहेब, सापळा अधिकारी यांनी मी आणि कवाडे मॅडम यांच्या मध्ये झालेले संभाषण ऐकुण श्रीमती कवाडे मॅडम यांची माझेकडे लाचेची मागणी नसल्याने लगेचच गै.अ. श्री. मुधोलकर यांचे विरूध्दची सापळा कार्यवाही आयोजीत केली.

मी ५००/— रू. च्या ४० चलनी नोटा असे २०,०००/— रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर साहेब यांचे कडे दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यांनतर दोन्ही पंचाचे समक्ष नोटावर पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर माझी अंगझडती यादी तयार करण्यात आली.

त्यानंतर सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेब यांनी सापळा कार्यवाही आयोजित केली. पावडर लावलेले २०,०००/— रूपये ज्यात ५००/— रूपयाच्या ४० चलनी नोटांचा समावेश त्या माझ्या फुल पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच क्र. २ श्री. डोये, यांचे हस्ते ठेवुन दिल्या. त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझे गळयात लटकवुन पंच क्र. १ श्री. पडोळे यांच्यासह श्री. मुधोलकर, यांचे कार्यालयात गेलो. गै.अ. हे कार्यालयात हजर नसल्याने मी तिथेच थांबुण होतो. काही वेळाने गै.अ. हे त्यांचे कार्यालयात हजर झाले. त्यांनी मला 'झालं का मॅडमशी बोलून माझेवर विश्वास नाही का? मॅडम आता नाही म्हनतात तुमच्याकडुन काही नको' अशी बोलनी करून त्यांनी माझे कडून लाच रक्कम स्विकारली नाही. त्यांमुळे मी कार्यालयाचे बाहेर येवून कोणताही ईशारा न करता पंच क्र. १ यांचे सह लाप्रवि कार्यालय भंडारा येथे आलो. काही वेळात आपण सुध्दा लाप्रवि कार्यालयात हजर आले. माझे गळयात लटकविलेला व्हाईस रेकार्डर बाहेर काढून पंच क्र. १ यांचे आवाजात बंद केला व माझे फुलपॅन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवली असलेली लाच रक्कम पंच क्र. २ यांचे हस्ते बाहेर काढुन एका शेंदरी रंगाचे लिफाप्यात श्री. अहेरकर साहेब यांनी सुरक्षित ठेवली. त्यांनतर मी व पंच क्र. १ यांनी सापळा अधिकारी व पंच क्र. २ यांना वरील माहीती सांगितली. संरक्षित संभाषनाची स्क्रिप्ट काढण्यात आली. मी व पंच क्र. १ यांनी दिलेली माहीती बरोबर असल्याचे पंच क्र. २ यानी व सापळा अधिकारी यांनी शहानिशा केली.

त्यांनतर मी सापळा अधिकारी यांना सांगितले की, गैरअर्जदार श्री. मुधोलकर, यांनी आज माझे कडून लाच रक्कम घेतली नाही. परंतु दोन चार दिवसांनी ते लाच रक्कमेबाबत मला संपर्क करू शकतात त्यामुळे त्यांचा मला फोन आल्यावर किंवा संपर्क केल्यावर आपण पुढची कार्यवाही करावी अशी विनंती केली असता सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेबांनी मला, दोन्ही पंचानां व सापळा कार्यवाहीतील सदस्यानां पुढील कार्यवाही बाबत गोपनियता बाळगण्याच्या सविस्तर सुचना समजावुन सांगितल्या व गै. अ. यांनी संपर्क केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यांबाबत सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचासमक्ष सविस्तर कार्यवाही केली.

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

दि. १७/०८/२०२० रोजी पर्यंत गै.अ. यांचे मला फोन न आल्याने मी श्री. मुधोलकर हे कार्यालयात हजर आहेत किंवा कसे या बाबत चौकशी केली असता, मुधोलकर हे रजेवर असल्याचे व या आठवडयात पोळा, गणपती च्या सुट्या असल्याने मुधोलकर हे पुढील सोमवारी दि. २४/०८/२०२० रोजी डयुडीवर येतील असे कळाले, त्यामुळे मी लाप्रवि कार्यालयात येवून सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेब यांना हि माहिती देवून मुधोलकर यांचे विरूध्दची कार्यवाही दि. २४/०८/२०२० रोजी किंवा त्या आधी मुधोलकर डयुटीवर आल्याचे माहीत पडल्यास किंवा त्यांनी मला संपर्क केल्यास तेव्हा सापळा कार्यवाही करण्याची विनंती केली होती.

दिनांक २२/८/२०२० रोजी माझी प्रकृती अचानक खराब झाल्याने मी वैद्यकीय उपराकरीता डॉ. गवळी यांचे खाजगी रूग्णालयात उपचारार्थ गेलो होतो. दि. २३/०८/२०२० रोजी डॉ. गवळी यांनी माझी कोविड–१९ ची टेस्ट करण्यास सांगितल्यावरून मी कोविड–१९ ची टेस्ट केली असता त्याच दिवशी माझी सांयकाळ पर्यंत रिपोर्ट प्राप्त होवुन मला कोविड–१९ नसुन निमोनिया असल्याची रिपोर्ट प्राप्त झाल्याने डॉ. गवळी यांनी मला आठवडाभर बेड रेस्ट करण्याचे सांगुण मी आठवडाभर औषोउपचार केला आहे.

दिनांक ०२/०९/२०२० रोजी माझे प्रकृतीमध्ये सुधारण होउन मला बरे वाटत असुन गै.अ. श्री. मुधोलकर यांनी आतापर्यंत मला माझे मोबाईल क्रमांकावर फोन केला नुसन ते माझ्याकडुन लाच रक्कम यानंतर स्विकारणार नाहीत. त्यामुळे मी त्यांचे विरूध्द सापळा अधिकारी यांना कायदेशिर कार्यवाही करण्याची विनंती केली.

एकंदरीत श्री. मुधोळकर यांनी कवाडे मॅडम यांचे नाव सांगुण मला लाच मागीतल्याने व पडताळणी दरम्यान तंळजोळ करतांना त्यांनी मला मॅडम सोबत भेटून तुम्हीच विचारा असे म्हटल्याने कवाडे मॅडम यांची श्री. मुधोळकर यांचा मार्फत माझेकडे खरच लाचेची मागणी आहे का हे पाहण्याकरीता दिनांक १४/०८/२०२० रोजीच्या कवाडे मॅडम यांचेकडे पडताळणी कार्यवाही वेळी मी, कवाडे मॅडम यांचेकडे मुधोलकर हे पैसाची मागणी करीत आहेत असे सांगीतले, तेव्हा कवाडे मॅडम यांनी मुधोलकर यांना विचारपुस केली असुन सापळा कार्यवाही वेळे मुधोलकर यांनी मला, झाला का मॅडमशी बोलून मायावर विश्वास नाही न, असे म्हणून माझे कडून लाच रक्कम घेण्यास नकार दिला होता. त्यामुळेच श्री. मुधोलकर हे माझे मोबाईल क्रमांकावर संपर्क केला नसुन ते माझेसोबत न बोलता मला कोणताही प्रतिसादर दिला नाही. यापुढे श्री. मुधोलकर हे माझे कडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत. त्यामुळे गै.अ. श्री. राजेश मुधोलकर, समाज कल्याण निरीक्षक समाज कल्याण विभाग, जि.प. भंडारा यांनी **''माझे, मागास्वर्गीय समाज कल्याण मुलांचे माटोरा येथील वस्तीगृहाचे सन २०१८–१९ च्या दुस–या टप्याचे ४० टक्के शासकिय अनुदान एक लाख बत्तीस हजार चारशे रूपये मंजुर करून दिल्याचा मोबदला म्हणुन समाज कल्याण अधिकारी श्रीमती कवाडे मॅडम यांचे नाव सांगुन स्वत: करीता २५,०००/– रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केल्याने, गैरअर्जदार श्री. राजेश मुधोळकर यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाहीस्तव: मी फिर्याद देत आहे.**

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली, ते माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

P. S. Gedam.
2/9/2020